महत्वाचे :
कालमर्यादित :

जा.क्र./मरापप/जीसीसी/मूल्य ४/२०१६/7363
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक :22/०२/२०१६

प्रति,

प्राचार्य/ संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

विषयः- जी.सी.सी. परीक्षा डिसेंबर - २०१५
उत्तरपत्रिका गैरमार्ग प्रकरणी परीक्षार्थींना हजर राहण्यासाठी कळविणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, जी.सी.सी. परीक्षा डिसेंबर - २०१५ च्या परीक्षेत उत्तरपत्रिका गैरमार्ग प्रकरणी परीक्षार्थींना दिनांक २२/०१/२०१६, २/०२/२०१६ ते ०४/०२/२०१६ या कालावधीत सुनावणीसाठी बोलविलेले होते.

तथापि, पहिल्या सुनावणीस उपरोक्त दिनांकास हजर राहू न शकलेल्या परीक्षार्थींना सुनावणीस दूसरी व अंतिम संधी सोबतच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देण्यात येत आहे. संबंधित सर्वसंस्था चालकांनी आपल्या संस्थेतील संबंधित परीक्षार्थींना विभागनिहाय दिनांकानुसार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेत पुणे -०१ येथे सकाळी ठिक १०.३० वाजता उपस्थित राहणेबाबत कळवावे.

उत्तरपत्रिका गैरमार्ग प्रकरणी विभागनिहाय दिनांकनिहाय विवरणतक्ता या पत्रासह परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(रा.वि.गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

E/Sonawane sir/Dec-2015/letter IMP

## जी.सी.सी. परीक्षा डिसेंबर २०१५

## उत्तरपत्रिका गैरमार्ग प्रकरणी सुनावणीसाठी हजर राहणेबाबतचा विवरण तक्ता

| अ.क्र | विभाग | सुनावणी प्रथम संधी दिनांक | सुनावणी व्दितीय/ अंतिम संधी दिनांक | सुनावणीसाठी परीक्षार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्व विभाग | २२/०१/२०१६ | २९/०२/२०१६ | ७५ | |
| २ | पुणे + औरंगाबाद + नागपूर | ०२/०२/२०१६ | ०२/०३/२०१६ | १६८ | |
| ३ | मुंबई + कोल्हापूर + नाशिक | ०३/०२/२०१६ | ०३/०३/२०१६ | २१५ | |
| ४ | लातूर + अमरावती | ०४/०२/२०१६ | ०४/०३/२०१६ | २२७ | |

टीप : १) गैरमार्ग प्रकरणी संबंधित परीक्षार्थींना टंकलेखन व लघुलेखन संस्थेमार्फत पत्राव्दारे उपरोक्त तक्त्यातील प्रथम संधी दिनांकास उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले होते. गुणपत्रकावर पुढील शेरा **RESERVE FOR INQUIRY** असणाऱ्या परीक्षार्थींनीच सुनावणीस उपस्थित रहावयाचे आहे. या शेरा शिवाय इतर शेरा असल्यास सुनावणीस येण्याची आवश्यकता नाही.

२) प्रथम सुनावणीस उपस्थित असणाऱ्या परीक्षार्थींनी दुसऱ्या सुनावणीस उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

३) उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता दिला जाणार नाही. (स्वखर्चाने उपस्थित रहावे)

(रा.वि.गोधने)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१